# राशिभविष्य - मार्च, २०१९

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

===================================================================

**(१) मेष -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होण्याची शक्यता आहे. पण लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. म्हणून सर्व आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. आर्थिक लाभ होणार असेल तर त्याला थोडासा विलंब होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. बुध ग्रहही अनुकुल असला तरी तो वक्री असल्यामुळे त्याच्यापासून मिळणाऱ्या अनुकुल गोष्टीत बाधा निर्माण होणे संभवते. तसेच केतूमुळे या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात काहीही कारणाने बाधा येणे संभवते. या राशीच्या काही युवकांना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी हा विचार सोडून द्यावा व आहे ती नोकरी वा व्यवसायच मनापासून करावा. तसेच हा केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर " वरून कीर्तन, आतून तमाशा " असे फसवे आचरण होणे संभवते. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ व हर्षल हे तापट व विक्षिप्त ग्रह असल्याने या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी, हट्टी, मानापमान फार असणारा असा घडला असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून, सहनशील बनून नमते घेऊन आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. नपेक्षा अकारण श्रम, दगदग कराल तर शारीरिक-मानसिक थकवा येईल. शिवाय शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकाराचे आजार त्रस्त करतील. परंतु हा हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक जीवनात कटकटी, त्रास निर्माण होतील. हाती घेतलेल्या कामात अपयश येईल. नंतर महिन्याच्या शेवटच्या सप्ताहात हा राहू या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर बंधुसुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग असेल त्यांना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसाहक्काने धनलाभ होणे शक्य आहे. भाग्य स्थानी असलेल्या शनीमुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्री हनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "श्रीगणेश अथर्वशीर्षाचे" व "हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी मंगळ व हर्षल हे संतापी व विक्षिप्त ग्रह असल्याने अकारण शत्रुत्व निर्माण होणे, मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे, सांपत्तिक अडचणी येणे, मानहानी होणे,अस्वस्थ मनस्थिती होणे, व्यावसायिकांना स्त्री वर्गाकडून त्रास होणे, भांडण्याचे प्रसंग येणे अशापैकी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर या राशीच्या नोकरदार मंडळींना तो प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू बंधुसुखात बाधा निर्माण करील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा राहू या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आर्थिक चिंता त्रस्त करील. शिवाय कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाह योग येणे

संभवते. तसेच ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते अधिक घट्ट होतील. काहींना अर्थलाभ होईल; तर काहींना नवे मित्र मिळतील. या राशीच्या ज्या स्त्रियांचा प्रसूति काळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रलाभ होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल; तर काहींना असमाधानकारक घटनांचा, अपेक्षाभंगाचा किंवा आर्थिक चिंतेचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शनि बरोबर गुरु व केतू असल्याने गुरूमुळे काही मनोनुकुल घटना घडतील; तर केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील तर केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना नोकरीत या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. तसेच कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात थोडा मनस्ताप सहन करावा लागेल. दशम स्थानी असलेला नेपच्यून मानसोपचार तज्ज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर
“शिवोपासना “ मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “ ओम नम: शिवाय “ मंत्राचा एक माळ जप करा. तसेच “शिवलीलामृत” स्तोत्राचे पठण करा.

**(३) मिथुन-** या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात विपरीत परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य होणे संभवते. जपा. पण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु ग्रह नोकरी-व्यवसायास पूरक असल्यामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांनाही सर्व काही अनिश्चित असल्याचा अनुभव येईल. शिवाय मित्रांशी भांडणे होणे संभवते. पण हर्षलसह असणाऱ्या मंगळ ग्रहामुळे कष्ट-परिश्रमानेच थोडे फार यश मिळू शकेल. शिवाय काही मंडळींना मौल्यवान गोष्टींचा लाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ ग्रह या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर शारीरिक-मानसिक मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. राहू ग्रहही पूर्णपणे प्रतिकुल असून मनस्ताप देणाराच असणार आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला गुरु ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर परिस्थितीत सुधारणा होईल. कायदा अभ्यास व वकिली व्यवसाय असणारांना शेवटचा सप्ताह अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात केतू ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी असल्याने कुटुंबात कलह निर्माण होणे संभवते. तसेच काही मंडळींना त्वचा रोग, काहींना मुखदंत रोग तर काहींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा केतू या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. पण या सप्तम स्थानी शनि ग्रह असल्याने जीवनसाथी शांत, विचारी असेल तर वैवाहिक जीवनात फारशी बाधा येणार नाही. महिन्याच्या पूर्वार्धात बुध -शुक्र या राशीच्या अष्टम स्थानी जातील तेव्हा मनोनुकूल घटना घडतील; पण बुध ग्रह वक्री असल्याने धनलाभ होण्यात बाधा निर्माण होणे संभवते. अष्टम स्थानी असलेला शुक्र ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर तो तेथील नेपच्यून ग्रहाबरोबर असेल. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. शिवाय शुक्रामुळे गुरुकृपा व चांगल्या लोकांचा सहवास लाभेल. काहींना थोरकृपा प्राप्त होईल; तर काहींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे
“श्रीगणेश अथर्वशीर्ष “ स्तोत्राचे व “श्रीहनुमानचलीसा” स्तोत्राचे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेला राहू महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असल्यामुळे अपमानास्पद घटनांना सामोरे जावे लागेल. काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. ज्यांचा अपमान होईल त्यांच्या मनात सूड भावना जागृत होईल. पण हाच राहू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्यय स्थानी गेल्यावर परिस्थितीत सुधारणा होईल. काही मंडळींना अर्थलाभ होईल; तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. हितशत्रूपासून रक्षण होईल. पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते अधिक घट्ट होतील. सर्व काही मनोनुकुल असे घडेल. पण हा गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. त्याच वेळी केतूही या राशीच्या सप्तम स्थानातून षष्ठ स्थानी येत आहे. त्यामुळे आरोग्य उत्तम राहील. या स्थानी असलेला शनि ग्रह दशम स्थानी असलेल्या हर्षलच्या कार्याला पूरक होईल. तसेच यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेला मंगळ ग्रह या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर कष्ट-परिश्रम करणारांनाच अनुकुल होईल व अपेक्षित अर्थलाभ होईल. काही भाग्यवान मंडळींना एखादी मौल्यवान वस्तू मिळण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या पूर्वार्धात असताना हा मंगळ केवळ औषधविक्रेत्यांना अनुकुल व लाभदायक होणे संभवते. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे शारीरिक=मानसिक अनारोग्य होण्याची शक्यता दिसते.जपा. पण या राशीच्या दशम स्थानी असलेल्या हर्षलमुळे चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाच संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे कमी श्रमात अर्थलाभ होणे संभवते. तसेच जन्मकुंडलीत योग असेल तर काही मंडळींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. पण येथे असलेल्या नेपच्यूनमुळे जलभय, विषभय आहे. त्यामुळे जलप्रवास करू नका व उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे " ओम नम: शिवाय " मंत्राचा एक माळ जप करा व "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करा.

**(५) सिंह -** गुरु ग्रह अनुकुल असल्याने या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांना स्थावर खरेदी करण्याची इच्छा आहे किंवा आहे ती स्थावर विकून टाकण्याची इच्छा आहे ती इच्छा अपेक्षेनुसार पूर्ण होऊ शकेल. पण महिन्याच्या पूर्वार्धात नातलगांपैकी कोणाचा तरी त्रास सहन करावा लागेलसे वाटते. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस अनुकुल असला तरी केतू उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी येत असल्याने अनारोग्यामुळे शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. विशेष करून पोटाचे आजार त्रस्त करतील. जपा. षष्ठ स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे उच्य प्रकारची गुणवत्ता असूनही प्रगतीची संधीच मिळत नसल्याचा अनुभव येईल. त्यामुळे काही मंडळीना नैराश्य येणे संभवते. काही जण व्यसनाधीन होणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या मंडळींना अनारोग्यामुळे व मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास नोकरी-व्यवसायात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर थोडा दिलासा मिळेल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग

येणे संभवते.  तसेच काहींना  परदेशगमनाचे योग  येणेही शक्य दिसते.  पण या  महिन्याच्या  पूर्वार्धात शक्यतो  प्रवास करू नका.  प्रवासात त्रास होणे संभवते. या हर्षलमुळे  शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना  संशोधन  कार्यात  अपेक्षित  प्रगती करणे शक्य होईल.  महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात नोकरीत  कामाचा असह्य  ताण  व वरिष्ठांचा  त्रास सहन करावा लागेलसे दिसते. तसेच स्वतंत्र व्यावसायिकांच्या  व्यवसायात खळबळजनक  घटना  घडण्याची शक्यता  दिसते.  जपा. महिन्याच्या पूर्वार्धात राहू  अनुकुल  असल्यामुळे हितशत्रूपासून  रक्षण होईल व अर्थलाभ होईल.  पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे  संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात  हा राहू या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर  बुद्धी विकृत होणे संभवते.  त्यामुळे वाममार्ग धन  मिळविण्याची दुर्बुद्धी होणे संभवते.जपा. तसेच  संततीविषयक एखादी चिंता त्रस्त  करण्याची शक्यता दिसते.  श्रद्धा असेल तर  श्रीशिवोपासना व श्रीहनुमान  उपासना मन:शक्ती  व  ,मन:शांती  देईल.  दररोज नियमितपणे  "ओम नमः: शिवाय" मंत्राचा एक  माळ जप  करा.  तसेच  "शिवलीलामृत " स्तोत्राचे  व "श्री हनुमानचालिसा" स्तोत्राचे  पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींनी  उगीचच  काल्पनिक  चिंता करून  अस्वस्थ  होऊ नये.  काही मंडळींना  उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची काल्पनिक चिंता  त्रस्त  करील. काही मंडळींची  फसवणूक  होण्याची शक्यता आहे. जपा.  या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण  काळ  अनुकुल , प्रगतिकारक  व लाभदायक होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात  या राशीच्या काही  कर्तृत्ववान  मंडळींना बढती, अधिकार, सन्मान  अशापैकी काही प्राप्त होण्याची शक्यता दिसते. पण अधिकाराचा दुरुपयोग होणार  नाही, याची काळजी  घ्या.  गायन, वादन , चित्रकला, छायाचित्रण  अशापैकी  सर्व  कलाकारांना  महिन्याच्या पूर्वार्धातच  कलेचा आनंद  घेणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात  कलेतील  उच्च  गुण  असूनही  ते प्रकट करण्याची  संधीच न मिळाल्याने अस्वस्थता येणे संभवते. त्यामुळे नैराश्य  येणेही शक्य आहे. अशी परिस्थिती  झाल्यास काही जण व्यसनाधीन होण्याची शक्यता असते.  म्हणून मनावर ताबा ठेवा,  सहनशील व्हा आणि  आपल्या कलात्मक छंदात आनंदी राहा.   महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शक्यतो प्रवास करू  नका. प्रवासात त्रास होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या पूर्वार्धात  गुरु ग्रह अनुकुल  असल्याने  या राशीच्या लेखकांचे लेखन  ग्रंथरूपाने  प्रसिद्ध होऊ  शकेल. पण या गुरु ग्रहामुळे भावंडापैकी   कोणाकडून  तरी  मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सुखस्थानी  असलेल्या शनि  ग्रहामुळे  विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात  बाधा येणे संभवते. घरातील कोणाशी पटणार नाही. जपा. पण महिन्याच्या  अखेरच्या सप्ताहात गुरु ग्रह सुखस्थानी  आल्यावर परिस्थितीत  सुधारणा  होईल.  काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार  अपेक्षेनुसार  पार पडतील.  पण नातलगांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या  शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. तसेच या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात  बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी  असलेल्या मंगळ  ग्रहामुळे उष्णताविकाराचे  आजार त्रस्त  करण्याची शक्यता आहे.  दुखापत होणे, हाडमोड होणेही शक्य आहे जपा. वीज व पाणी यांपासून धोका असल्याने व अपघात होण्याची शक्यता  असल्याने  सतत सावधानतेने आचरण करा . श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव  दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे  पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या सप्तम स्थानी हर्षल हा विक्षिप्त स्वभावाचा ग्रह असून तेथेच उष्ण प्रकृतीचा मंगळ ग्रहही आहे. त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास होणे संभवते. विशेष करून मूळव्याधीसारख्या उष्णताविकाराचा आजार होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर तर अधिकच अनारोग्य होणे संभवते. शिवाय जीवनसाथीचे अनारोग्य, पतिपत्नीत होणारे वाद, मतभेद, दोघापैकी एकाचे लहरी, विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते .जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल, प्रगतिकरक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात विरोधी परिस्थिती निर्माण होणे संभवते. शिवाय संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय भावनाशील झाली असल्यास त्यांनी आध्यात्मिक उपासनेकडे लक्ष द्यावे. त्यासाठी काळ अनुकुल होईल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात राहू या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर प्रवासाची संधी मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे महिन्याच्या पूर्वार्धात कुटुंबात शुभ घटना घडतील, तसेच अर्थलाभ होणेही संभवते. स्वतंत्र व्यवसाय असणारांनाही व्यवसायात प्रगती करणे शक्य होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा गुरु ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर भावंडापैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. या राशीच्या मंडळींना गृहसौख्याच्या दृष्टीने महिन्याचा बराचसा काळ प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. पण ज्यांना शेतीवाडी आहे त्यांना शुक्रामुळे भरपूर लाभ होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने या राशीच्या मंडळींनी सहनशील बनून व मनावर संयम ठेवून आध्यात्मिक उपासनेत काळ व्यतीत करावा , असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण गुरु-शुक्र ग्रह अनुकुल असले तरी राहू, केतू, शनि हे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे गुरु-शुक्रामुळे होणाऱ्या लाभात व सुखात बाधा येण्याची शक्यताच अधिक दिसते. मंगळ ग्रहामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. इजा होणे, अंगावर फोड येणे, ताप येणे अशापैकी आजार होण्याची शक्यता आहे. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी अधिक काळजी घेतली पाहिजे. मंगळाबरोबर हर्षल ग्रहही असल्यामुळे काही मंडळींना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक नुकसान होणे, चोरी होणे,अपप्रचाराचा त्रास होणे अशापैकी घटना घडणेही संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात हा मंगळ औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. त्यामुळे त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच अपेक्षित प्रगती करण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य कटकटींमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या तरी अनारोग्याची समस्या मनस्ताप देईल. प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण झाल्यास अस्वस्थ मनस्थिती होईल. नियोजित कार्यात अडथळे येणे, दिरंगाई होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. महिन्याच्या अखेरच्या

सप्ताहात ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "ओम नम:शिवाय " मंत्राचा एक माळ जप करा. तसेच " हनुमानचालिसा स्तोत्रा "चे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींनी शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे याची जाणीव ठेवूनच त्यांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून विचारपूर्वक आचरण केल्यास होणारा मनस्ताप खूपच सुसह्य होईल. या राशीतच शनि ग्रह असल्याने स्वतः:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय जनांचे स्थलांतर होणे, सतत नको असलेल्या घटना घडणे अशापैकी कारणांनी नैराश्य येणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात व्ययस्थानी असलेला गुरु व केतू ग्रह प्रथम स्थानी आल्यावर परिस्थितीत थोडी सुधारणा होईल, काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या धनस्थानी असलेला केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर आर्थिक चिंता मिटेल व शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने अर्थलाभ होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती प्रतिकूल होणे संभवते. त्यामुळे घरीदारी मनस्तापच सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मंगळ ग्रहासह हर्षल ग्रहही असल्यामुळे या राशीच्या काही मंडळींना अनारोग्याचा त्रास होणे संभवते. काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अयोग्य आचरणाची समस्या त्रस्त करील. या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. मंगळ ग्रह अनारोग्यकारकच असल्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. काहींना ताप येणेही संभवते. हृदयविकार असणारांनी मन शांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास होणे संभवते. पण या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल ग्रह बौद्धिक धडाडी देईल, कलाकारांना कलेतील प्रगतीस अनुकुल होईल व प्रेमसंबंधालाही अनुकूल होईल. राहू ग्रहामुळे मन व बुद्धी विकृत होणे संभवते. वाममार्ग धन मिळविण्याची इच्छा प्रबळ होईल. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. तरीही ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना महिन्याच्या पूर्वार्धात धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शक्ती देईल व प्रतिकुल काळ व्यतीत करणे शक्य होईल. "ओम नम: शिवाय " मंत्राचा दररोज नियमितपणे एक माळ जप करा व "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करा.

**(१०) मकर -** शनि ग्रहाच्या साडेसातीपैकी केवळ एक वर्षांचा काळ व्यतीत झाला आहे. त्यामुळे भावी काळ प्रतिकुलच आहे याची जाणीव ठेवून सतत मन व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करत राहूनच भावी काळ व्यतीत करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे सतत असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. सर्व आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेने .करा. कसल्याही मोहाला बळी पडू नका. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु ग्रह लाभस्थानी असल्याने मनोनुकूल घटना घडतील, विवाहेच्छूंना विवाहयोग येईल, नवे मित्र मिळतील, वाहनसुख मिळेल व विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल.

पण उत्तरार्धात गुरु  व केतू ग्रह व्ययस्थानी आल्यावर  केतूमुळे स्वभाव लहरी होणे  संभवते.  गुरु ग्रहामुळे केवळ समाजकार्य  करत आसणारांना  व अध्यात्माची आवड असणारांना  काळ  थोडा अनुकुल होईल. पण  इतर बाबतीत अपेक्षाभंग  होणे,  कौटुंबिक  त्रास होणे, प्रवासात अडचणी येणे  अशा घटना घडण्याची शक्यता आहे.जपा. प्रथम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे महिन्याच्या उत्तरार्धात थोडे वैवाहिक  सुख , कौटुंबिक सुख  मिळेल.  काही मनोनुकुल घटना घडतील. महिन्याच्या पूर्वार्धात  वाहन अपघात भय असल्याने  वाहन सावधानतेने,  लक्षपूर्वक  व नियंत्रित वेगानेच चालवा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना  या महिन्याचा उत्तरार्धच  अनुकुल, अपेक्षापूर्ती करणारा व लाभदायक होईल.  महिन्याच्या पूर्वार्धात  वाढत्या खर्चाची चिंता, आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच काही मंडळींना डोळ्याचे अनारोग्य  त्रस्त  करील. शिवाय  वाद, भांडणे होण्याची शक्यताही दिसते. जपा. मंगळ , हर्षल  ग्रहांमुळे  घरात कोणाशी पटणार नाही,  सतत तक्रारी कराल,  आहे त्यात सुखसमाधान  लाभणार नाही,  वास्तुसुख लाभणार नाही, सतत असमाधानकारक घटना घडतील. कुटुंबात भांडणे, गैरसमज अशापैकी कटकटी होत राहतील. जपा.  मंगळ  ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर  संतति  समस्या त्रस्त  करण्याची शक्यता दिसते. त्या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी  अकारण दगदग करू नये.  सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच विचार विकृत होण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा  राहू  या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर  हितशत्रूंवर विजय मिळविणे शक्य होईल. अन्य जातिधर्माच्या  मित्रांपासून लाभ होईल. पण  काही मंडळींना पोटाचे अनारोग्य  त्रस्त  करील. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल.  दररोज नियमितपणे “ओम नम:शिवाय” मंत्राचा  एक माळ जप करा व “श्रीहनुमानचालिसा “ स्तोत्राचे  पठण करा.

**(११)  कुंभ -** सध्या या  राशीच्या मंडळींची मनस्थिती  अतिशय कोमल झाली असावी असे वाटते.  तसे असेल तर मानसिक संवेदनाही  अति जलद  होत असल्या  पाहिजेत. त्यामुळे मनाविरुद्ध  थोडे  काहीही घडले  तरी लगेच उदासीनता येऊन  गहरे  नैराश्य  येत असले पाहिजे. रवि  ग्रह पूर्णपणे  प्रतिकुल  असून त्यामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य  होणे संभवते. तसेच हाती घेतलेल्या  कार्यात प्रगतीपेक्षा पीछेहाटच  होत असल्याचा अनुभव  येत असेल. चिंता व मनस्ताप यांमुळे शारीरिक अनारोग्य व थकावट येत असेल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी  विशेष  जपावे.  महिन्याच्या उत्तरार्धात  विविध कारणांनी आर्थिक समस्या  त्रस्त  करण्याची  शक्यता  आहे. कुटुंबात वाद, भांडणे  झाल्यास शारीरिक उष्णता भडकून डोळ्याची दुखणी बळावतील. जपा. वाहन  धोका असल्याने  रस्त्याने चालताना, वाहन  चालवताना  अत्यंत सावधानतेने  मार्गक्रमण करा. महिन्याच्या उत्तरार्धात स्वभाव लहरी झाल्यास नको ते घडेल.  जपा. पण शुक्र ग्रह अनुकुल  असल्याने मधून मधून मनोनुकुल  घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना  या महिन्याचा  काळ  प्रतिकुल  असल्याचाच अनुभव येईल.  पण  उच्य  बौद्धिक व  शास्त्रीय  संशोधन कार्यक्षेत्र असणारांना  काळ  अनुकुल व प्रगतिकारक होईल.  महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ  ग्रह अनुकुल  असल्याने  हिम्मत, महत्त्वाकांक्षा  वाढेल.  हातून कर्तृत्व  घडेल.  पण अपघात योग असल्याने  सतत  सावधानतेने  विचारपूर्वक आचरण करा.  काही मंडळींना प्रवासाचे तर  काहींना परदेशगमनाचे  योग येतील. तसेच गुरु ग्रह पूर्णपणे अनुकुल  असल्याने काही कर्तृत्ववान मंडळींना मानसन्मानाचा योग  येईल. काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र  मिळू शकेल. आणखी  काही मनोनुकुल  घटना  घडतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात  मंगळ  या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर  विविध कारणांनी  कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते.  जपा.  राहू  या राशीच्या षष्ठ स्थानी  असेपर्यंत  हितशत्रूंपासून रक्षण होईल. अन्य  जाति धर्माच्या मित्रांकडून लाभ होईल. पण  विष

भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. हा राहू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचमस्थानी गेल्यावर दलाली - कमिशनवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. पण तो विविध कारणांनी संतति सुखात बाधा निर्माण करील. जपा. या काळात या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या लाभस्थानी असलेला शनि ग्रह साधारण शुभ असेल; पण मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर "शिवोपासना " व "श्रीहनुमान उपासना" मन:शक्ती व मनशांती देईल. दररोज नियमितपणे "ओम नमः शिवाय" मंत्राचा एक माळ जप करा. "शिवलीलामृत " स्तोत्राचे व :"श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा "चे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अस्वस्थ मनस्थिती, पराजय, चिंता, वाढता खर्च अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंता त्रस्त करील. देणे द्यावेच लागेल; पण येणे कधी येईल ते कळणार नाही. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून घसा, मान,दाढा व डोळे यापैकी कसले तरी अनारोग्य त्रस्त करील. अस्थिर स्वभाव, अविचाराने खर्च होणे, फटकळ बोलून समोरच्याचा अकारण अपमान करणे अशा गोष्टी घडण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ ग्रह अनुकुल होईल व त्यामुळे परिस्थिती थोडीशी अनुकुल होईल. पण पंचम व चतुर्थ स्थानी असणारा राहू कौटुंबिक सुखात व संतति सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या पूर्वार्धात या राहूमुळे दलाली, कमिशन वर व्यवसाय करत असणारांना अपेक्षित अर्थलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला गुरु ग्रह अध्यात्माची आवड असणारांना .अनुकुल होईल व आध्यात्मिक सुखसमाधान देईल. काही मंडळींना प्रवासाचे योग्य येतील. काहींना कीर्ती ,प्रसिद्धी प्राप्त होईल. अपेक्षित अशी मनोकामना पूर्ण करण्यास योग्य संधी प्राप्त होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर तेथील शनि ग्रहास अनुकुल होईल व वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना तसेच अन्य बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. काहींना नवे आवडीचे कार्यक्षेत्र मिळेल. अविस्मरणीय घटना घडतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसे करू नये. आहे ती नोकरीच करावी. या राशीच्या व्यापारी मंडळींना हा केतू प्रतिकुल होईल. पण बुध -शुक्र ग्रहांच्या अनुकुलतेने सर्व काही सुखाचेच होईल व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====